# पुणे पोलिसांच्या वाहतूक शाखेची रस्त्यावरील वाहनांच्या वेगाला आळा घालण्यासाठी मोहीम सुरु

**रस्त्यावरील वाहनांचा वेग हे अपघातांचे प्रमुख कारण असल्याचे लक्षात आल्याने पुणे वाहतूक विभाग पोलीस यांनी वेगाने वाहन चालविण्याला आळा घालण्यासाठी ब्लूमबर्ग फिलांथ्रॉपीज इनिशिएटिव्ह फॉर ग्लोबल रोड सेफ्टी (BIGRS) सह मिळून जनजागृती मोहिमेला सुरुवात केली आहे.**

**नोव्हेंबर २२, २०२३ पुणे:** पुणे पोलिसांनी, ब्लूमबर्ग फिलांथ्रॉपीज इनिशिएटिव्ह फॉर ग्लोबल रोड सेफ्टी (BIGRS) अंतर्गत भागीदार असलेल्या जागतिक आरोग्य संस्था 'व्हायटल स्ट्रॅटेजीज' च्या तांत्रिक सहयोगाने, वाहन चालकांना वेगाने वाहन चालवण्याच्या दुष्परिणामांबद्दल चेतावणी देणारी एक नवीन मास मीडिया मोहीम सुरू केली आहे. हि मोहीम देशभरातील रस्त्यांवर वेग हे अपघातांचे प्राथमिक कारण असल्याचे आढळल्याने सुरु करण्यात आली आहे.

२१ नोव्हेंबरपासून चार आठवडे चालणाऱ्या या मोहिमेदरम्यान, पुणे शहर पोलीस शहरातील रस्त्यांवर विशेषतः रात्री आणि पहाटेच्या वेळी अंमलबजावणीच्या उपाययोजना वाढवणार आहेत. शहर पोलिसांच्या २०२२ च्या रोड क्रॅश डेटा विश्लेषणातून असे दिसून आले कि पुणे शहरात रात्री ११:00 ते पहाटे १:०० दरम्यान सर्वाधिक जीवघेणे रस्ते अपघात घडून आले आहेत व एकूण ३२७ मृत्यूंपैकी, ७५ मृत्यू रात्री ११:०० ते पहाटे १:०० च्या दरम्यान घडले आहेत. या वेळी रिकाम्या रस्त्यांवर अजाणतेपणे वाहनांचा वेग वाढतो ज्यामुळे जीवघेणे रस्ते अपघात होतात.

जिल्हाधिकारी पुणे यांच्या अध्यक्षतेखाली पुणे जिल्हा रस्ता सुरक्षा समितीने पुणे शहर पोलिसांनी संकल्पलेल्या "वेगवान वाहन एका कुटुंबाच्या भविष्यासाठी महागात पडू शकते: नारकरांची कथा" या मोहिमेला आपल्या सकारात्मक कृतीतून पाठिंबा दिला आहे. मोहिमेचा एक भाग म्हणून जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख आणि पुणे शहर पोलीस आयुक्त श्री. रितेश कुमार यांनी पुणे शहरातील सर्व सिनेमा गृहांमध्ये ३० सेकंदांच्या सार्वजनिक सेवा घोषणा (Public Service Announcement ) व पूरक असे आऊटडोअर आणि डिजिटल मीडिया प्लेसमेंट सुरु केले.

या मोहिमेत एक वडील, श्री. संजय नारकर ज्यांनी आपला २४ वर्षांचा मुलगा रस्ते अपघातात गमावला आहे यांची हृदयद्रावक सत्यकथा दाखवण्यात आली आहे. या PSA चित्रफितीमधे श्री. नारकर यांनी वेगाने वाहन चालविण्याचे परिणाम आणि घरातील एका सदस्याच्या मृत्यूचे कुटुंबावर होणारे परिणाम यांचे वर्णन केले आहे.

"गेल्या काही वर्षात वाहनांचा रस्त्यांवरील वेग प्राणघातक आणि गंभीर दुखापतींसाठी एक कारक घटक म्हणून उदयास आला आहे ज्यामुळे कधी कधी पीडितांना कायमचे अपंगत्व देखील येते. फक्त पिडीतांवर परिणाम करण्याव्यतिरिक्त असे रस्ते अपघातातील अचानक मृत्यू कुटुंबाला देखील भावनिक आणि आर्थिक दृष्ट्या अपंग करतात." असे पुणे शहर पोलीस आयुक्त रितेश कुमार म्हणाले.


"शहरात किंवा शहरी भागात वाहनांना वेग नसतो हा एक सामान्य गैरसमज आहे, जेव्हा रस्ते तुलनेने रिकामे असतात तेव्हा ते वेगाला आमंत्रण देतात आणि अपघात होतात ज्यामुळे रस्ता अपघातात मृत्यूमुखी पडलेल्यांच्या संख्येत वाढ होते. म्हणून नियमित केलेल्या वेगमर्यादेपेक्षा जास्त वेग रोखणे महत्वाचे आहे. या मोहिमेद्वारे पादचाऱ्यांसह रस्ते वापरणाऱ्या सर्वांच्या सुरक्षिततेसाठी वाहनांचा वेग कमी करण्याचे आमचे ध्येय आहे." असे श्री विजयकुमार मगर, पोलीस उपायुक्त (वाहतूक) म्हणाले.

पुणे पोलीस महत्वाच्या चौकांमध्ये आणि जास्त जोखमीच्या ठिकाणी वेगात येणाऱ्या वाहनांच्या घटनांना तोंड देण्यासाठी अंमलबजावणी वाढवतील. २०२२ पासून ब्लूमबर्ग फिलांथ्रॉपीज इनिशिएटिव्ह फॉर ग्लोबल रोड सेफ्टी च्या अंतर्गत १४ प्रशिक्षण सत्रांतून प्रशिक्षित झालेले पुणे शहरातील वाहतूक विभागातील अधिकारी सहभागी होतील.

या मोहिमेद्वारे पुणे पोलिसांनी वर्ल्ड डे ऑफ रिमेम्बरन्स फॉर रोड क्रॅश व्हिक्टिम (WDoR) दिनानिमित्त रस्ते अपघातात जीव गमावलेल्या लोकांचे स्मरण केले. जागतिक स्तरावर WDoR चे स्मरण दरवर्षी नोव्हेंबर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी केले जाते आणि रस्त्यांवरील अपघात कमी करण्याच्या जागतिक प्रयत्नांमध्ये ते एक महत्वाचे साधन आहे.

| **पुणे शहर रस्ता अपघात परिस्थिती, 2022** | |
|---|---|
| एकूण अपघात | 978 |
| मृत्यू झालेले एकूण अपघात | 309 |
| एकूण मृत्यू | 327 |
| पादचारी मृत्यू | 106 |
| दुचाकीस्वार मृत्यू | 187 |
| कार पॅसेंजर मृत्यू | 8 |
| इतर मृत्यू | 26 |
| सर्वाधिक मृत्यू ११ pm ते १ am मध्ये | 75 |




न पोहोचण्यापेक्षा
उशीर चांगला आहे !
वेगमर्यादा पाळा, अपघात टाळा !
पुणे शहर वाहतूक पोलीस
PUNE CITY TRAFFIC POLICE
पुणे पोलीस
Pune Police